सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/९१० दिनांक : १५/०५/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत ...**

**संदर्भ क्र : उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/मवि–१/२०२६/६८५ दि. १३.०५.२०२६ चे पत्र**

महोदय/महोदया,

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी खालील मुद्द्यांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे.

१. सार्वजनिक वाहतुकीचा वापर : शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.
२. इंधन व ऊर्जा बचत : पेट्रोल–डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा.'कार–पुलिंग (Car-Pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.
३. परदेश दौरे व अनावश्यक खर्च : सध्याची परकीय चलन साठयाची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीने किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.
४. महत्वाच्या/अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (Online Meetings) आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यास प्राध्यान द्यावे.
५. स्वदेशीचा आग्रह : भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
६. जीवनशैलीत बदल : स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. तसेच शैक्षणिक संकुलांमध्ये या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. या संदर्भात मा. उच्च शिक्षण संचालनालय यांचे उपरोक्त संदर्भीय पत्र प्राप्त झाले आहे. सदर सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

मा. प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे – १६ यांच्या निर्देशानुसार आपले महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबविण्यात याव्यात.

सदर वरील उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. तसेच आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये आपणामार्फत आयोजित केलेल्या कार्यक्रम/उपक्रमांचा अहवाल (www.unipune.ac.in – BOD Online – Login - Username – Password - students development - menu – gov joint scheme proposal – other joint scheme proposal – Add new – योजना निवडा – **"सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत"** अहवाल) येथे ऑनलाईन पध्दतीने प्राधान्याने भरण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात यावे. कळावे ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/मवि-१/२०२६/ई /885 दि.१३.५.२०२६

13 MAY 2026

विद्यार्थी विकास मंडळ आवक क्र. 7204 14 MAY 2026 सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. सर्व कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषयः भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत.

संदर्भः मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने केलेले आवाहन.

उपरोक्त विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी खालील मुद्द्यांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे.

1. सार्वजनिक वाहतुकीचा वापरः शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.
2. इंधन व ऊर्जा बचतः पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. 'कार-पूलिंग' (Car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.
3. परदेश दौरे व अनावश्यक खर्चः सध्याची परकीय चलन साठ्याची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीचे किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.
4. महत्वाच्या/अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (Online Meetings) आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यास प्राधान्य द्यावे.
5. स्वदेशीचा आग्रहः भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
6. जीवनशैलीत बदलः स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. शैक्षणिक संकुलांमध्ये (Campuses) या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. तरी, आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना आणि विभागांना या संदर्भात तात्काळ सूचना निर्गमित कराव्यात आणि केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करावा.

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

| | |
|---|---|
| आवक क्र. आर/ | 2840 |
| दिनांक : | 14.05.2026 |
| जावक दिनांक | 14.05.2026 |
| विभाग : | |

- Dir. BEE
- EE
- FAO
- DR. Admin(T)
- DR. Admin(NT)
- Dir. BSD

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

प्रत माहितीसाठी सादरः

मा. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-32.

मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-32.

14/5